झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व
पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तांत्रिक १/ १११९ /२०२३
दिनांक : २६/०६/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-प्रारूप योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४ (३) अन्वये)

प्रस्तावना :

१. मौजे गुलटेकडी,सि.स.नं.५४४ अ/१अ पै., टी.पी.स्कीम नं. III, फा.प्लॉ.क्र. ४३०, प्लॉ.क्र. ४४, मध्ये अस्तित्वात असलेल्या डायस प्लॉट झोपडपट्टी संदर्भात ९४६.३९ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. २३/०२/२०१५ रोजी सदर मिळकतीवरील ९८.२७ टक्के झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.परंतु तद्नंतर विकसक मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस यांनी सदर पुनर्वसन योजना विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांना खरेदीखता द्व्यारे विक्री केल्याने सदर योजना क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस ऐवजी विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांनी नेमणूक करणेत आली असल्याबाबत दिनांक ३०/०९/२०२२ रोजी आदेश पारित करणेत आलेला आहे.

२. सदर क्षेत्रावर झोपडपट्टी असल्याचे खालील अहवालांनुसार स्पष्ट होत आहे.

अ) सदर क्षेत्र तत्कालिन सक्षम प्राधिकारी तथा उपआयुक्त, महानगरपालिका, पुणे यांनी महाराष्ट्र शासन राजपत्र दि. २३/०२/१९८४ चे प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ चे कलम ४(१) मधील तरतुदीनुसार "झोपडपट्टी क्षेत्र" म्हणून घोषित केले आहे.

३. उक्त अधिनियमातील कलम ३ क च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र हे "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र" म्हणून दि. १०/०२/२०१४ रोजी घोषित करण्यात आले असून सदर आदेशास खालीलप्रमाणे प्रसिद्धी दिली आहे.

अ) महाराष्ट्र शासनाचे राजपत्र दि.२६/०२/२०१४ चे अधिसुचनेद्वारे पृष्ठ क्र. २६ वर प्रसिद्ध करण्यात आला आहे.

आ) सदर आदेशास स्थानिक वृत्तपत्र दै.लोकमत व दैनिक सांजमहानगरी मध्ये दि. १२/०२/२०१४ रोजी प्रसिद्ध करणेत आलेला आहे.

४. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचे प्रारूप उक्त नियमावलीतील नियम क्र. एस आर ४(३) अन्वये खालीलप्रमाणे उपलब्ध करून देण्यात येत आहे.



Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

❖ झोपडपट्टी पुनर्वसन प्रारूप योजना:

झोपडपट्टीचे नाव : डायस प्लॉट झोपडपट्टी

महानगरपालिका क्षेत्र : पुणे महानगरपालिका

योजना क्षेत्र : ९४६.३९ चौ.मी.

| अ.क्र. | स.नं./सि.स.नं./ फा.प्लॉट नं. | क्षेत्र (हेक्टर - आर) (मालमत्ता पत्रकानुसार) | अधिकार अभिलेखातील भोगवटादाराचे नाव |
|---|---|---|---|
| १ | मौजे गुलटेकडी,सि.स.नं.५४४ अ/१अ पै., टी.पी.स्कीम नं. III, फा.प्लॉ.क्र. ४३०, प्लॉ.क्र. ४४ | ९४६.३९ चौ. मी. | मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स |
| | एकूण | ९४६.३९ चौ. मी | मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स |

| | | |
|---|---|---|
| १ | योजना क्षेत्र चतु:सीमा :-<br>अ) दि. १०/०२/२०१४ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम ३ क च्या अधिसुचनेप्रमाणे पुढीलप्रमाणे चतु:सीमा प्रसिद्ध करण्यात आली होती. | (एकत्रित ३ क आदेश) |
| | ब) दि. २६/०४/२०१७ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या अंतिम ३ ड च्या अधिसुचनेप्रमाणे पुढीलप्रमाणे चतु:सीमा प्रसिद्ध करण्यात आली होती. | पूर्वेस - रस्ता<br>पश्चिमेस - रस्ता<br>उत्तरेस - रस्ता<br>दक्षिणेस - फा.प्लॉट क्र ४३० पै. |
| २ | अ) विकसकाचे नाव. | मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स |
| | ब) झो.पु.प्रा., पुणेकडील विकसक नोंदणी क्रमांक. | झोपुप्रा/१८/२०१६ दि.०२/०१/२०१६ वर्ग "अ" |
| | क) विकसकाच्या गठनासंदर्भातील नोंदणीबाबतचा तपशील.<br>भागीदारी अधिनियमानुसार Registrar of Partnership Firm यांचेकडील नोंदणी तपशील. | पार्टनरशीप<br>ROF कडील रजिस्ट्रेशन नं<br>MPA 67191<br>Date- 10/09/2007 |
| ३ | वास्तुविशारद नाव व त्यांच्या नोंदणीचा तपशील. | आर्कि. एट्रियम डिजाइन स्टुडिओ<br>CA/२०१८/१००८२८ दिनांक ३१/१२/२०२९ |
| ४ | मिळकतीचे स्वरूप<br>अ) शासकीय/निमशासकीय/खाजगी | खाजगी |
| | ब) खाजगी मिळकत असल्यास भोगवटादाराचे | मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स तर्फे श्री रशीद अब्दुल |

१२.सदर प्रकरणी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०२० च्या विनियम १४.६ नुसार पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी लागू असलेली विशेष नियमावली २०१४ ही पुनर्वसन घटकासाठी तर मुक्त विक्री घटकासाठी एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०२० मधील तरतूदी लागू होतील.

१३.सदर प्रकरणी मे. मिनामणी इस्टेट एंटरप्रायझेस या जुन्या विकसकाकडून योजना नवीन विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांचेकडे हस्तांतरित करण्यास दि.२९/०९/२०२२ रोजी मान्यता दिली आहे.त्यानुसार नवीन विकसकाने बांधकाम परवानगी पूर्वी ७०% झोपडीधारकांची संमती त्यांचे नावे प्राप्त करून SRA कडे सादर करवी.

१४.सदर योजनेचे विकसक मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने व प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील.

सदरची प्रारूप योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- २६ / ०६ /२०२३

26.6.2023

नीलेश र. गटणे भा.प्र.से
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, महानगरपालिका, पुणे.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   - सक्षम प्राधिकारी क्र.४
   -सहा.निबंधक सहकारी संस्था - सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   -संगणक शाखा - सदर आदेशास संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
३. **जमिनीचे भोगवटादार - मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स शॉप नं ०३, शहनुर कॉम्प्लेक्स ५१४,भवानी पेठ पुणे ४११०४२**
४. **विकसक- मे. बुशरा कन्स्ट्रक्शन्स शॉप नं ०३, शहनुर कॉम्प्लेक्स ५१४,भवानी पेठ पुणे ४११०४२**
५.मौजे गुलटेकडी,सि.स.नं.५४४ अ/१अ पै., टी.पी.स्कीम नं. III, फा.प्लॉ.क्र. ४३०, प्लॉ.क्र. ४४, (डायस प्लॉट झोपडपट्टी) येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.